पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 20/02/2020 (गुरूवार)
(सायंकाळ)

---

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. मौदा :–अंतर्गत 15 कि.मी. वडोदा ते कुही फाटयाजवळ येथे दिनांक 15/02/2020 चे 19:00 वा. दरम्यान मृतक/आरोपी – गुलाब धनुजी तुमसरे, वय 45 वर्ष, रा. मौदा हा त्याच्या एम.एच–40/बीएन–6040 क्रमांकाच्या मोटरसायकलने वडोदा ते कुही मार्गाने जात होता. दरम्यान आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन सायकल स्वार यास कट मारली. या अपघातात मोटरसायकल स्वार आरोपी हा खाली पडून गंभीर जखमी होवुन स्वतःचे मरणास कारणीभुत ठरला. तर सायकल स्वार हे किरकोळ जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– लुकराम बळीरामजी आंबिलडुके, वय 58 वर्ष, रा. भुगाव त. कामठी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री. आगासे 9130001715 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर